# समग्र शिक्षा, जिल्हा परिषद, सांगली
# स्काऊट गाईड गणवेश शिलाई करिता
# ई - निविदा सुचना क्रमांक : 01/2024

मा. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्या निर्देशानुसार जिल्हा परिषद, सांगली अंतर्गत इयत्ता 1 ली ते 8 वी पर्यंतच्या विदयार्थ्यांच्यासाठी स्काऊट गाईड गणवेशाची शिलाई करावयाची आहे. सन 2024 - 25 या शैक्षणिक वर्षात शिक्षण घेण्या-या विदयार्थ्यांचा गणवेश शिलाई करून घेण्याच्या सुचना असून, त्या प्रमाणे इच्छुक संस्थेकडून दोन लिफाफा पध्दतीने ई - निविदा मागविण्यात येत आहे.

| कामाचे नाव | निविदा फार्म विक्री व जमा करण्याचा दिनांक | निविदा भरण्याचा अंतिम दिनांक | तांत्रिक लिफाफा उघडण्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| जिल्हा परिषद सांगली अंतर्गत 09 गटस्तर व 130 केंद्रस्तरावरील इ. 1 ली ते 8 वी च्या 1,14,363 विदयार्थ्यांच्यासाठी स्काऊट गाईड गणवेशाची शिलाई करून मिळणेबाबत. | दिनांक. 18/12/2024 दुपारी 12.00 ते दिनांक 01/01/2025 सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत | दिनांक 01/01/2025 वेळ सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत | दिनांक 02/01/2025 वेळ सकाळी 11.00 वाजता |

| निविदा शुल्क | वयाणा रक्कम EMD |
|---|---|
| रू. 10000/- | रू. 1,25,799/- |

नियम अटीच्या अधिन राहून इच्छुक संस्थाकडून वर नमुद कामासाठी ई- निविदा http://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दिनांक 18/12/2024 वेळ दुपारी 12.00 वाजता ते दिनांक 01/01/2025 वेळ सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत भरावयाची आहे. निविदापूर्व बैठक (PreBid Meeting) करिता निविदा प्रसिध्द झालेनंतर दिनांक 23/12/2024 वेळ सकाळी 10.00 वाजता समग्र शिक्षा, प्राथमिक शिक्षण विभाग, जि.प. सांगली या टिकाणी इच्छुक निविदा धारकांनी उपस्थित रहावयाचे आहे.

1. वर नमुद केल्याप्रमाणे निविदा अर्ज शुल्क रक्कम रू. 10,000/- व बयाना रक्कम रू. 1,25,799/- ही ऑनलाईन पध्दतीने SAMAGRA SHIKSHA Z. P. SANGLI. HDFC Bank Sangli खाते क्रमांक 50100661413225. IFSC Code - HDFC0000222 या खात्यावर जमा करावयाची आहे.
2. महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा आणि कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भा.खा.सा.2014/प्रा.क्र.82/कलम II II/उदयोग-4 दिनांक 1 डिसेंबर 2016 खरेदी धोरणाच्या परिशिष्ट-8 मधील तरतुदीनुसार MSMED कायदा 2006 अंतर्गत नोंदणीकृत सूक्ष्म आणि लघु. मध्यम उद्योगांना निविदा फॉर्म फी आणि बयाणा रक्कम भरण्यापासून सूट देण्यात आली आहे. टेव EMD सरकारी मंड कॉर्पोरेशन / उपक्रम आणि सूक्ष्म लघू आणि मध्यम उदयोग

नोंदणीकृत उत्पादक आणि पुरवठादार निविदा फॉर्म फी आणि वयाणा ठेवीतून सूट देण्यात आली आहे. सोबत अधिकृत प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील तरच सुट अनुज्ञेय राहील.

3. ई- निविदा धारकानी ई -निविदा http://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर विहित कालावधीत ऑनलाईन पध्दतीने सादर करावी.

4. सदरील ई- निविदा प्रक्रिया ही http://www.mahatenders.gov.in यांचे मार्फत राबविण्यात येत असून, निविदे संदर्भात प्रक्रिये दरम्यान, कोणतीही कायदया प्रमाणे अथवा नियमानुसार बाब अथवा वाद उदभवल्यास या बाबतचा अंतिम निर्णय हा सांगली येथील न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात राहील.

5. मंजूर निविदाधारकाने निविदा अटी व शर्ती मंजूर असलेबाबत हमीपत्र र.रु. 12100/- च्या स्टँम्प पेपरवर सादर करणे बंधनकारक राहील.

6. या ई - निविदेतील कोणताही भाग वाढविणे किंवा कमी करणे/ रदद करणे वा इतर कोणत्याही बदलासाटीचे हक्क या कार्यालयाने राखून ठेवलेले आहेत. सदरील बदल हे या ई- निविदेच्या अटी व शर्तीच्या भाग असतील. सदरची ई - निविदा ही https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून करण्यात येत असून, ती सादर करण्यासाटी येणा-या खर्चाची संपूर्ण जबाबदारी ही संबधित निविदाधारकाची राहील. ही ई- निविदा रदद केल्यास वा नामंजूर झाल्यास खर्चाची प्रतिपूर्ती देय होणार नाही. तसेच भरणा केलेल्या रकमेच्या परताव्याबाबत संबंधित संकेतस्थळ व शासनाचे प्रचलित नियम लागू राहतील.

7. सदरील ई- निविदा ही विहित मुदतीत दोन लिफाफा पध्दतीने सादर करावयाची असून, तांत्रिक लिफाफ्यासाटी खालील नमूद कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक राहील. शासन निर्णयानुसार किमान निविदा धारक प्राप्त न झाल्यास नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. त्यामुळे पात्र निविदा धारकाची संख्या विहित मर्यादेत असल्यास, अशा निविदा धारकांचा तांत्रीक लिफाफा उघडण्यात येऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

8. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई यांचे पत्र जावक क्रमांक 1634/24, दिनांक 05/06/2024, तसेच पत्र जावक क्रमांक 1088/24, दिनांक 22/03/2024, शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक एस एस ए - 2023/ पत्र 150 (भाग-2) एएडी-3 दिनांक 10/06/2024, तसेच शासनातर्फे या संदर्भात वेळोवेळी प्राप्त निर्देश सदरील ई- निविदा प्रक्रियेसाटी लागू राहतील.

9. सांगली जिल्हातील जिल्हा परिषदे अंतर्गत पलूस तालुका वगळून उर्वरित 9 तालुक्यातील शाळांमध्ये सन 2024-25 या शैक्षणिक वर्षात गट व केंद्र स्तरावरील विद्यार्थी / विद्यार्थीनीची संख्या - 57218 मुले / विद्यार्थी, 57145 मुली / विदयार्थीनी, अशा प्रकारे एकुण 1,14,363 विद्यार्थी असून, मा. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई यांचेकडील नमूद पत्रातील निर्देशानुसार गणवेश शिलाई करून देणे आवश्यक राहील.

10. गणवेशाचे कापड शिलाई साटी संबंधित शिलाई काम कारागीर/ पुरवठा दारास प्राप्त झाल्यानंतर सदरील कापडाची सुरक्षितता ही त्यांची राहील. गणवेशाचे कापड सुरक्षित ठेवणे, चोरी जाणार नाही याची काळजी घेणे,

शासन निर्देशानुसार अचूक मापाप्रमाणे शिलाई करून देणे, शिलाईचे काम मुदतीत पूर्ण करून शिवलेले गणवेश संबंधित गट व केंद्रस्तरावर/ शाळास्तरावर परत करण्याची जबाबदारी नियुक्त संस्थेची राहील.

11. गणवेश कापड प्राप्त झाल्यानंतर 30 दिवसात अचूक शिलाई करणे आवश्यक आहे. गणवेश शिवणकाम करण्यास दिलेल्या मुदतीपेक्षा जास्त विलंब झाल्यास शासनाचे निर्देशानुसार विलंबाकार आकारण्यात येईल. गणवेश शिलाई करुन गणवेश शाळास्तरापर्यंत पोहोच करणेचे आहेत. तसेच संख्यात्मक व गुणात्मक दर्जाबाबत मुख्याध्यापकांकडून केंद्रप्रमुखांमार्फत अहवाल घेऊन गटशिक्षणाधिकारी यांनी सदर अहवाल एकत्रित करुन नाहरकत दाखला दिल्यानंतरच सदर देयक अदा करण्याची कार्यवाही शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प.सांगली यांचे मार्फत महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांचे मार्गदर्शक सूचनेनुसार करणेत येईल. तसेच शासनाच्या निर्देशाप्रमाणे निधी प्राप्त झाल्यावर संबंधित पुरवठादाराच्या नावे PFMS प्रणालीव्दारे अदायगी करण्यात येईल. सदरील देयक प्रदान करताना शासन निर्णयानुसार Income TAX/GST चे TDS कर, इतर शासकीय कपाती करून सोबत दिलेल्या अटी व शर्तीची पूर्तता केल्यावर उर्वरित रक्कम प्रदान केली जाईल.

12. मंजूर निविदा धारकाने मूल्यांच्या 3 % रक्कम SAMAGRA SHIKSHA Z. P. SANGLI. HDFC Bank Sangli खाते क्रमांक 50100661413225. IFSC Code - HDFC0000222 या खात्यावर अनामत रक्कम जमा करावयाची आहे.

Signed by Mohan Sambhaji Gaikwad
Date: 17-12-2024 21:06:13

(मोहन गायकवाड)
**शिक्षणाधिकारी (प्राथ)**
**जिल्हा परिषद, सांगली.**

Signed by
Trupti Ankush Dhodmise
Date: 17-12-2024 21:25:27

तृप्ती धोडमिसे (भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, सांगली.**

## तांत्रिक लिफाफा (Technical) सादर करावयाचे कागदपत्रे

1. स्काऊट गाईड गणवेश शिलाई काम करून देणा-या संस्थेचे नाव
2. संस्थेचा नोंदणी क्रमांक/ जीएसटी दोन क्रमांक / TAN क्रमांक
3. संस्था / दुकान नोंदणीचे प्रमाणपत्र
4. उदयोग विभागाकडे संस्थेची नोंद असल्याबाबतचे CFC प्रमाणपत्र
5. CA प्रमाणपत्राची प्रत (IT / E-Governance सर्व्हिसेस मधून सरासरी वार्षिक उलाढाल दाखविणा-या प्रती मागील 3 वर्षाच्या )
6. संस्थेस शासनाच्या कोणत्याही विभागामार्फत काळया यादीत / दाखलपात्र गुन्हात समावेश केलेली नसल्याबाबतचे हमीपत्र
7. अर्जाचे शुल्क व बयाना रक्कम ऑनलाईन भरणा केल्याबाबतचा कगदपत्राची प्रत
8. ई- निविदेच्या अनुषंगाने सोबत जोडलेल्या अटी शर्ती मान्य असल्याबाबतचे र.रु.500/- च्या स्टँम्प पेपरवर स्वयंघोषणापत्र.
9. शिलाई मशीन ची संख्या --------, शिलाई कारागिरांची संख्या--------, प्रतिदिन शिलाई करू शकणा-या गणवेशाची संख्या ----------- दर्शविणा-या स्वप्रमाणपत्राची प्रत. सदर पुरवठादारास दर दिवशी किमान 10000 गणवेश संच शिवण्याची क्षमता असावी याबाबतची खातरजमा विभागाच्या संबधीत नेमून दिलेल्या अधिका-यांस पटवून देणे आवश्यक राहील.
10. शासनाकडील गणवेश शिलाईचा अनुभव असल्यास त्याची प्रत व पुरवठा आदेश जोडणे आवश्यक आहे. मागील 3 वर्षात एकूण पुरवठा आदेशाच्या एकच अनुभव असेल तर Bid Value च्या 80 %, दोन कामांचा पुरवठा आदेशाचा अनुभव असेल तर Bid Value च्या 50% तसेच तीन कामांचा पुरवठा आदेशाचा अनुभव असेल Bid Value च्या 40% असा निकष लागू राहील. पुरवठादाराने अनुभव प्रमाणपत्र जोडत असताना पुराव्या दाखल आवश्यक कागदपत्रे सोबत जोडणे अनिवार्य राहील.
11. इच्छूक निविधाधारकाची मागील 3 आर्थिक वर्षाची सरासरी उलाढाल रक्कम निविदा रक्कमे पेक्षा जास्त असावी.

12. गणवेश कापड ताब्यात मिळाल्यापासून शिलाई होऊन मिळेपर्यंतच्या कालावधीत कापडाचे नुकसान झाल्यास सदरील कापडाची रक्कम ही शासनास परत करण्यात येणार असल्याचे हमीपत्र प्रत
13. संस्थेच्या बँक पासबुक/ रदद धनादेश यांची प्रत.
14. महिला बचत गट/ अपंग संस्था तत्सम संस्था नोंद असल्याचे प्रमाणपत्र.
15. निविदाधारक काळया यादीत समाविष्ट नसलेबाबतचे स्वयंघोषणापत्र रु.रु.500/- च्या स्टॅम्प पेपरवर देणेचे आहे.
16. तांत्रिक दृष्टया पात्र करण्यासाठी आपण शिलाई केलेले (स्पेसिमन) नमूना तांत्रिक समिती समोर सादर करावा लागेल. समितीस शिलाई दर्जाबाबत खात्री होणे आवश्यक राहील.

**तांत्रिक लिफाफा - 2 (Financial) सादर करावयाचे कागदपत्र-**

शासन निर्णयानुसार प्रत्येक विदयार्थी स्काऊट गाईड गणवेश शिलाईसाठी रक्कम रू. 110/- सर्व अनुज्ञेय करासहित निर्धारित करण्यात आलेली आहे. त्यानुसार ई- निविदे BOQ मध्ये वित्तीय देकार सादर करणे आवश्यक आहे व त्याची एक प्रत वित्तीय लिफाफ्यासोबत सादर करावी.

Signed by Mohan Sambhaji Gaikwad
Date: 17-12-2024 21:04:59

(मोहन गायकवाड)
**शिक्षणाधिकारी (प्राथ)**
**जिल्हा परिषद, सांगली.**

Signed by
Trupti Ankush Dhodmise
Date: 17-12-2024 21:24:49

तृप्ती धोडमिसे (भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, सांगली.**

# समग्र शिक्षा, शिक्षण विभाग (प्राथ.) जिल्हा परिषद, सांगली
## स्काऊट गाईड गणवेश शिलाई करिता
## ई -निविदा सूचना क्रमांक : 1/2024

मा. राज्य प्रकल्प संचालक महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई यांच्या निर्देशानुसार जिल्हा परिषद सांगली अंतर्गत इयत्ता पहिली ते आठवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी स्काऊट गाईड गणवेशाची शिलाई करावयाची आहे. सन 2024-25 या शैक्षणिक वर्षात शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांचा गणवेश शिलाई करून घेण्याच्या सूचना असून, त्याप्रमाणे इच्छुक संस्थेकडून द्वि लिफाफा पध्दतीने ई- निविदा मागविण्यात येत आहे.

| कामाचे नाव | निविदा फार्म विक्री व जमा करण्याचा दिनांक | निविदा भरण्याचा अंतिम दिनांक | तांत्रिक लिफाफा उघडयाचा दिनांक | निविदा शुल्क | बयाणा रक्कम EMD |
|---|---|---|---|---|---|
| जिल्हा परिषद सांगली अंतर्गत 09 गटस्तर व 130 केंद्रस्तरावरील इ. 1 ली ते 8 वी च्या 1,14,363 विदयार्थ्यांच्यासाठी स्कऊट गाईड गणवेशाची शिलाई करून मिळणेबाबत. शिलाई दर प्रती गणवेश रू 110/- सर्व करासहित निर्धारित केलेला आहे. | दिनांक. 18/12/2024 दुपारी 12.00 वाजता<br>ते<br>दिनांक 01/01/2025 सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत | दिनांक 01/01/2025<br>वेळ सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत | दिनांक 02/01/2025<br>वेळ सकाळी 11.00 वाजता | रू. 10000/- | रू. 1,25,799/- |

नियम अटीच्या अधीन राहून इच्छुक संस्थाकडून वर नमूद कामासाठी ई- निविदा https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक - 18/12/2024 दुपारी 12.00 ते दिनांक 01/01/2025 वेळ सायंकाळी 5.00 वाजे पर्यंत भरावयाची आहे.

**Signed by Mohan Sambhaji Gaikwad**
**Date: 17-12-2024 21:03:19**

**शिक्षणाधिकारी (प्राथ.)**
**जिल्हा परिषद,सांगली**